म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७५५

REFBK-0006041

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं नं १८५५

# …णसुधा



किंमत ४ आणे

कवि–मुरलीधर



' पुण्यश्लोक महात्माजी. '

# सद्गुणांसुधा

लेखक—

मुरलीधर मोरेश्वर कुलकर्णी

REFBK-0006041



[ हक्क स्वाधीन ]

प्रसिद्ध: रथसप्तमी १८५२ प्रथम मुद्रण १९२१

किंमत चार आणे

प्रकाशक.—

द. गो. फडके.
बी. ए. एल् एल्. बी

श्री. वि नाईक
बी ए

व

र. ब. भावे, बी. ए
चिटणीस,
भारतस्नेहसंवर्धक
मंडळ पुणें

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ थोरांची थोरवी | ३ |
| २ गांधींची मुरली | २३ |
| ३ अहल्यागौरव | २५ |
| ४ भवितव्यता | २७ |
| ५ हरिहर | २९ |
| ६ भारतकेतुवंदनम् । | ३१ |


मुद्रक—
शंकर नरहर जोशी,
चित्रशाळा प्रेस, १०२६
सदाशिव पेठ पुणें

# प्रकाशकांचे दोन शब्द.

भारतस्नेहसंवर्धक मंडळ पुण्यांत चैत्र शुद्ध १ शके १८४८ रोजीं स्थापन झालें. त्या वेळेपासून मंडळानें केलेली लोकसेवा महाराष्ट्रास विदित आहेच.

आज मंडळास निराळ्या तऱ्हेनें लोकसेवा करण्याची संधी येत आहे; त्याबद्दल आनंद होत आहे. मंडळाचें काम करण्याची पद्धति व ध्येय यांचा जणूं काय सारणामच, म्हणून रा. रा. मुरलीधर मोरेश्वर कुळकर्णी यांना 'सद्गुण–सुधा' लिहिण्याची स्फूर्ति झाली, असें म्हणावयास हरकत नाहीं. मंडळाच्या प्रगमनशील कार्याचें प्रतिबिंब यांत पूर्णपणें आहे, म्हणूनच मंडळानें हें प्रथमप्रकाशनकार्य अंगावर घेतलें आहे. आज प्रकाशित होणारा हा सद्गुण सुधेचा अल्पसा भाग आहे. याचा योग्य स्वीकार झाल्यास सद्गुणसुधेची मोठी आवृत्ति प्रकाशित करण्यास मंडळास उमेद येईल.

पुस्तकास प्रेमानें प्रस्तावना लिहिल्याबद्दल सौ. सरलाबाई नाईक, एम्. ए., व अभिप्राय व्यक्त केल्याबद्दल श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, प्रो. चिं. ब. नाईक, रा. रा. बाबूराव जगताप, बी. ए., बी. टी. व प्रो. दत्तो वामन पोतदार यांचें मंडळ ऋणी आहे. मुरलीधरकवि यांच्या गुणग्राहकतेचा लाभ मंडळास, मातृभूमीचे निस्सीम भक्त श्री. लक्ष्मणराव फडणीस यांच्या कृपेनें झाला, हें येथें नमूद करणें आम्हांस पवित्र कर्तव्य वाटतें. पुस्तकाच्या मुद्रणाचिसौदर्याबद्दल श्री. शं. न. जोशी यांचें, मंडळ फार आभारी आहे.

ही नूतन अंगीकृतसेवा, महाराष्ट्र जनता प्रेमानें स्वीकारील अशी आशा आहे.

पुणें,
तारीख २६–१–३१.

प्रकाशक.

## पुणें सेवासदन सोसायटीनें प्रसिद्ध केलेलीं

# पुस्तकें.

| | | किंमत रु आ. पै |
|---|---|---|
| १. | हार्मोनियम प्रवेश ... ... | १–०–० |
| २. | शिक्षणकला–विज्ञान ... ... | १–०–० |
| ३. | शिशु–संगोपन ( मराठी ) ... | १–८–० |
| ४. | " " ( गुजराथी ) ... | १–८–० |
| ५. | टॉक्स् ऑन् इन्फंट्र् वल्फेअर् ... | १–८–० |
| ६ | बाल–शुश्रूषा ... ... | १–०–० |
| ७. | बालबोध आरोग्य ... ... | ०–४–० |
| ८. | निरोगी राहणी ... ... | ०–४–० |
| ९. | आईचीं कर्तव्यें ... ... | ०–८–० |
| १०. | माता व मुलें यांचें दैन्य ... ... | ०–२–० |
| ११. | आमच्या आयुष्यांतील आठवणी ( सुधारलेली आवृत्ति छापत आहे )... | १–०–० |
| १२. | रुग्णपरिचर्या ... ... ... | २–०–० |
| १३. | खेड्यापाड्यांतील रोगराई... ... | ०–०–६ |
| १४. | फ्लारेन्स नाइटिंगेलचें चरित्र ... | ०–२–० |
| १५. | कोहिनूर आणि प्रेमकार्य ... ... | १–८–० |
| १६. | नर्सिंग असोसिएशनचे पेपर्स | ( छापत आहे ) |
| १७. | मानवशरीरविज्ञान. ... | ( छापत आहे ) |

**सेवासदन सोसायटी, पुणें नं. २**

# प्रस्तावना

'सद्गुणसुधेचे' सहा कलश एकत्रित करून लोकांपुढें ठेवण्याचें काम भारतस्नेहसवर्धक मंडळानें केलें आहे, हें स्वाभाविक व त्यांच्या नांवाला साजेसेंच आहे. आज भरतखंडांत बंधुभगिनींत स्नेह व एकी असण्याची अत्यंत जरूरी आहे जातवर्णधर्ममतादिभेदांना बळीं न पडतां सर्वत्र परस्पर आदर, प्रेम व सहानुभूति वाढावी यासाठींच या मंडळाचा स्तुत्य प्रयत्न चाललेला असतो. अर्थात् स्नेहसवर्धक असें वाङ्मय प्रकाशित करण्याचा हा प्रयत्नही पहिलाच असला तरी स्तुत्य आहे.

शाळांतून शिकविलें जाणारें काव्य-वाङ्मय क्लिष्ट, जुनें व अपुरें आहे या विषयीं महाराष्ट्रांतील विद्वान् मंडळींत बरीच चर्चा झालेली आहे, त्याबाबतींत सुधारणा घडवून आणण्याची अतिशय तीव्रतेनें आवश्यकता भासू लागली आहे

मुलांचें मन ज्याप्रमाणें वडपिंपळादि झाडांपेक्षा, चित्रविचित्र पण सुंदर फुलझाडांकडे जास्त आकर्षित होतें, त्याचप्रमाणें वाङ्मयोद्यानातसुद्धां चरित्रात्मक किंवा उपदेशात्मक काव्यापेक्षां किंवा गंभीर व उच्च कल्पनांनीं भरलेल्या काव्यापेक्षां साध्या, लहान, सोप्या व गंमतीदार कवितेंत जास्त रमतें. हें तत्व ध्यानांत ठेवून मनोरंजक असें वाङ्मय महाराष्ट्रांत हळूहळू निर्माण होऊं लागलें आहे हें देशाच्या भाग्योदयाचेंच चिन्ह आहे ! व त्याचा हा इष्ट परिणाम आहे थोरांप्रमाणें बालांनाहीं 'सद्गुणसुधा' मनोरंजक खास होईल.

शिवाय आपल्या देशावर भक्ति व प्रेम बसण्यास, व स्वाभिमान उत्पन्न करण्यास इतर राष्ट्रांचीं, स्वदेशांतील निरनिराळ्या प्रांतांची व निरनिराळ्या लोकांची थोरवी आबालवृद्धांना कर्णमधुर व ओजस्वी भाषेंत सादर केल्यास आनंदाबरोबर न कळत त्यांच्यांत स्फूर्तीची दिव्यज्योत उद्भूत होईल इतकेंच नव्हे, तर त्या त्या थोर व्यक्तींविषयीं आदर उत्पन्न होऊन, आपोआप त्यांचा कित्ता गिरविण्याची बुद्धि त्यांच्यात सदैव जागृत होईल. इतके थोर लोक जेथें आहेत किंवा होऊन गेले, त्या आपल्या देशाविषयीं साहजिकच त्यांना प्रेम वाटू लागेल. अशाच प्रकारचा प्रयत्न सदर पुस्तकांत कवि 'मुरलीधर' यांनीं केला आहे, तो यशस्वी आहे.

लेखकांचे व प्रकाशकांचे उच्च हेतु व प्रयत्न आजच्या पुस्तकानें लोकांत पसरून त्यांच्यांत स्वदेशभक्ति जागृत करून, कलहानें व भेदानें जर्जर झालेल्या आपल्या मातृभूमीस ह्या 'सद्गुणसुधेनें' पुन उच्च व स्वतंत्र अशा पदास पोंचविण्याचे कामीं ते यशस्वी होवोत अशी परमेश्वराजवळ नम्र प्रार्थना आहे !

सेवासदन पुणें

सरलाबाई नाईक.

लेडी सुपरिंटेंडेंट

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १९ | १ | स्फूर्ति निष्ठेची | निष्ठेची स्फूर्ति |
| १९ | १ | मूर्ति नरिमनची | नरिमनची मूर्ति |
| २७ | १९ | कौशल्य | कौशल |
| २८ | १३ | अपणाला | कोणाला |
| २९ | ६ | जगतीं आले | जगतीं झाले |
| २९ | १० | स्वातन्त्र्य | स्वातंत्र्य |
| ३० | ५ | सिंहाला | सिंहालागीं |
| ३० | २४ | भातर | भारत |
| ३१ | ५ | निःशस्त्रला | नि शस्त्राला |
| ३१ | १५ | मुक्त | युक्त |
| ३१ | २८ | विजिगीषूणं | विजिगीषूणां |

मुरली कोणाची–मुरलीधर [illegible]ची।
कंठहि नसतां घडाडि ज्याची [illegible] याचा ॥

जे वी चैतन्य, बी ए एल् एल् बी

# माझीं गाणीं.

( चाल–चला सुट्टी )

तुला माझीं गाणीं नवीं
गाऊन मी दाखवीन ॥ ध्रु० ॥
सृष्टि गाते गाणीं जगा गुंगऽवुनी
माझें लिखाण केवळ पाहीं
सुरसता न माझी कांहीं ॥ १ ॥
शारदेनें भाषा योजिलेल्या रसा
दिली जशी तशी मी घेई
मम याच्यांत कांही नाहीं ॥ २ ॥
पौरस्त्यांची माया पाश्चात्यांची छाया
राहताती मेळानें याही
कालाचीही असे पुण्याई ॥ ३ ॥
कवीश्वरऽगुणी वाणीकंठऽमणी
जग मोहून घेती कांहीं
मी हा पाईक त्यांचा गाई ॥ ४ ॥

—मुरलीधर.

## ॥ श्रीमत्सद्गुणसुधासमर्पणम् ॥



अर्वाचीनमहाकवींद्रपदवी येन स्वयं भूषिता । सा दृष्टा प्रतिभा पुरा समुदिता व्यासेन वाल्मीकिना । ब्रह्मानन्दसुखोदयोद्भवकरी ये नास्तिकास्तानपि । मूढानां भ्रमहारिणीच सुरसा यस्यैव गीतांजली । स्वेयं मम काव्यशक्तिधरत्वा लोकाभिरामाच या । निर्मातारमिम नतोऽस्मि मननं काव्याब्धिदेव मुदा । किंचिज्ज्ञेन रवींद्रनाथचरणे चापल्यमच्चारिणा । नव्या कृत्युपदैव सद्गुणसुधा भक्त्या मयैषाऽर्पिता ॥

मु मो कुलकर्णी

# १–थोरांची थोरवी.

( चाल—माया जळली )




सद्गुरु तो कोण ?
रामदास जाण !
महाराष्ट्रधर्माचा
द्रष्टा तेजाची खाण. १

तलवार् कोणाची ?
श्रीशिवरायाची !
स्वदेश-धर्मा स्वतंत्रकर्त्या
विजयी वीराची ! २





भाला कोणाचा ?
बाजीरावाचा !
सार्वभौम ही मराठशाही
जगिं करणाऱ्याचा ! ३







भरारि कोणाची ?
त्या राघोबाची !
शत्रु अटकेपार पळवुनि
झेंडा ने त्याची ! ४

अक्कल कोणाची ?–त्या हो, नानाची !
लढवय्ये जे मोठे मोठे–नमविले त्याची ! ५

कद्ऽर कोणाची ?–पाटिलबूवाची !
गाजिवली ती पाटिलशाही–खरीच बाण्याची ! ६



बाणा कोणाचा ?
प्रतापसिंहाचा !
स्वातंत्र्याचें ब्रीद राखिलें
जाशि वदली वाचा ! ७

माता त्या बोला !
जीजाबाईला !
स्वतंत्र नसतां वीररसानें
भरवी शिवबाला ! ८



राणी शीलवती ?
अहल्यादेवी ती !
वैभवगिरिवरी वैधव्यामधिं
विशुद्ध राही ती ! ९

अबला वीरवती ?
झांशीवाली ती !
थक्क अरीला करून गेली
छातीची महती ! १०





ज्योती तेजाची ?
विष्णू शास्त्र्याची !
अचेतनाला दिली चेतना
स्वदेशधर्माची ! ११



लढाइ बुद्धीची ?
त्या श्रीटिळकाची !
कालालाही टकरा देउनि
नमवीलें त्याची ! १२

सच्चिच्छक्तीची ?
शांती गांधीची !
शांतीसाठीं तयारि ज्याची
जीवित त्यागाची ! १३






त्यागऽ कोणाचा ?
त्या श्रीदासाचा !
देशासाठीं फकीर बनला
क्षणांत जो त्याचा ! १४

धडाडि कोणाची?
त्या श्रीलालाची.
उत्साहाची लाट जयाची
जग हलवायाची ! १५







महर्षि-गुण त्याचा ?–दादा भाईचा !
स्वराज्यगंगेस्तव जो ! झाला भगिरथ भूमीचा !

द्वेषाचा वैरी !–डॉक्टर अनसारी !
खरी मनीषा हिंदूमिंदू !–बांधव करणारी ! १७



प्रतिकारी कडवा–मुंजे जाणावा !
सहिष्णुता करि मल्ल जाणुनी दुस्मानी कावा. १८



चातुर्यऽ साचें !–मोतीलालाचें !
परस्परांना विरुद्ध पक्षीं प्रेमानें नाचे ! १९



बोली कोणाची ?
शिवरामपंताची
पाषाणासहि स्फूर्ति
स्फुरवी ऐशा मोलाची ! २०

कवित्व कोणाचें ?
रवींद्रनाथाचें !
काव्य वाहतें यत्कंठांतुनि
ब्रह्मानंदाचें ! २१





लेखऽकोणाचा ?
नरसोपंताचा.
समतोलाचा
व्यवहाराचा
कुणा न खुपण्याचा !





सोज्वलता मूर्ती ?—मालवियाची ती !
पाश्चात्यांचा पौरस्त्यांचा संगम दावि ती ! २३

उद्योगी मूर्ती ?—ॲनिबेझंट् जगती !
विश्वा गवसाणें घालायासि इच्छी सदैव ती ! २४

'शुद्धी' कोणाची ?—श्रद्धानंदाची !
आवृत द्वारें उघडीं केलीं हिंदूधर्माचीं ! २५



छाती कोणाची ?—सावरकर याची !
अभय कारागारें सागरें हुल्लड लीलेची ! २६





मुत्सद्दी गाजी—विठ्ठलभाईजी
कालोदरांत राहुनि राखि जनशाही राजी २७

सरदारी त्याची !—वल्लभ भाईची !
निशस्त्रांना रणभूमीवर ! लढत ठेवण्याची !



तरुणांतील वीर—हिरा जवाहीर !
स्वातंत्र्यास्तव तो लढणारा गातिल शाहीर २९




भक्ती तत्त्वाची—जयकररायाची
सृष्टि फिरली तरी न फिरली मति यन्निष्ठेची ३०

—— ——




वीरांचा वीर !—सुभाष अनिवार !
स्थापूं इच्छी स्वातंत्र्यास्तव स्वतंत्र सरकार ! ३१





स्फूर्ती निष्ठेची ?—मूर्ती नरिमनची !
स्वातंत्र्याच्या लढ्यांत गाती प्रेमें यत्कीर्ती ! ३२

स्त्रियांत स्त्री होई ?—सरोजिनी बाई !
भारतभूषण महिला पदवी तिलाच ती द्यावी. ३३

दानऽकोणाचें ?—जमनालालाचें !
परार्थ वाहति ओघ जयाच्या सदैव वित्ताचें ! ३४




शोधकता साची ?
जगदीशऽयाची !
अणु-रेणू-मधिं आत्मा
भरला ठरवीणाऱ्याची ! ३५



अंतःकरणाचा
सद्गुण तुकयाचा
थबथबलेल्या भक्तिरसाचा
अभंगवाणीचा ३६

योग कोणाचा—एकनाथ याचा
प्रपंच साधुनि--परमार्थाचा लाहो करण्याचा ३७

---





पंथ भक्तीचा ?—श्री ज्ञानेशाचा !
कैवल्याचा सोपानावर अभेद करण्याचा ! ३८
तार्किकता घ्यावी ?—पूर्णतेस न्यावी !
धन्य विवेकानंद नास्तिका आस्तिक जी बनवी ! ३९


भक्त धर्माचा ?--रामतीर्थ साचा !
दिगंत झेंडा गाजविला हो वैदिक धर्माचा. ४०
धर्म धारणेचा--कूर्तकोटि याचा
सर्व जगाचा सनातनाचा सतेज संकृतिचा ४१

न्यायमूर्ति राणा ?--महादेव जाणा !
पाश साहुनी ज्यानें केलें स्वदेशकल्याणा. ४२
विधवांची आई--सती रमाबाई
पतिदेवाची तेवत ठेवी दैवी पुण्याई ४३

अबलोन्नति वीर ?
कर्वे--देवधर !
सबल ज्यांनीं अबलां केलें ?
विरोध जरी फार,

ग्रंथालय ठाणे
क्रा. ६८४१
(स्थळ प्रत)





कळकळ कोणाची ?--आगरकर याची !
कधीं न ढळली होतां होळी यत्सद्धतूची. ४५
समदृष्टी साची ?--श्रीगोपालाची !
समाजसत्ता-राजकारणीं प्रगती करण्याची. ४६
आणिक किती विभुती ?--भारतिं या असती !
वर्णाया गुण ज्यांचे गमते अशक्यता खरि ती ४७
रत्नांची खाणी--श्रीभारतजननी
वैभवभानू उदया आणिल उदयागिरी म्हणुनी. ४८

---

# २—गांधींची मुरली

मुरली तुझी गोड गांधी । मुरली तुझी गोड रे ॥धृ॥
गुर्जरांच्या गोकूळांसी । वेणुनाद ऐकवीसी ॥
तुझ्या सत्यशांतिनादें । भुलले सारे देश रे ॥ १ ॥
आफ्रिकेस ऐकवीली । सत्याग्रही गाजवीली ॥
अमेरिका झाली राधा । गोपी सर्व भूमि रे ॥ २ ॥
हिंद्भूमी भूलवीली । स्वावलंबी बनवीली ॥
कालियाच्या डोईवरी । केला गोड नाच रे ॥ ३ ॥
दादाभाई नौरोजीचा । लोकमान्य अरविंदाचा ॥
पारतंत्र्यनाशायाचा । नादा गोड गोवि रे ॥४॥

स्वार्थत्याग वसुधाभक्ति । कार्यकुशल जीवन्मुक्ति
आर्यसंस्कृतीची शक्ति । तेजोमान होई रे ॥ ५ ॥
असहयोग काढियेला । वज्र होय भारताला ॥
अभंगासी भंगायाला । दिधली दिव्यशक्ति रे ॥६॥



वीरसिंह अल्लाबंदू । त्यांसि केलें गाय साधू ॥
वेणूनाद गोड भारी । केलें शत्रु मित्र रे ॥ ७ ॥

अंत्यजासि उद्धारीलें । खादीमय भारत केलें ॥
अत्त्याचार टाळायासी। करिसी कार्यत्याग रे ॥८॥
नरसिंहदासलाला । अयंगारपंडितपाला ॥
शास्त्रिवेझंटपक्षीयासी । राखी समतोल रे ॥ ९ ॥
सत्याग्रह संघटीला । शस्त्रहीन लढवीला ॥
पाशवसि बंधन घाली। तूझी आत्मशक्ति रे ॥१०॥
देशधर्म एक केले । भारतास रंगवीलें ॥
काराग्रह आश्रम केलें । लीला होय थोर रे ॥११॥

---

# ३--अहल्यागौरव.

( लोकगीत )

फूलांमध्यें फूल । कमलाचें सुगंधित ।
राणीमधें राणी । अहल्याबाई कीर्तिमंत ॥१॥
तलवारी हो मध्यें । तलवार शिवाजीची ।
असिधाराव्रता राणी । अहल्या इंदूरची ॥ २ ॥
नभोंगणीं ताराराणी । शुक्र तारा चकाकत ।
इतिहास-अंगणांत । अहल्या राणी लकाकत ॥३॥
हिऱ्यांमध्यें हीरा । कोहिनूर बहु मोल ।
नाहीं अहल्येच्या । लौकिकाला मूळीं मोल ॥४॥

शुभ्र रंग भारी। धूतल्या ग ऽ तांदळाचा।
अहल्या देवीचा रंग। तैसा हो शीलाचा ॥५॥



सावित्री दमयंती। सीता तारा मंदोदरी।
अहल्याराणीची। कीर्ति भारी यांच्यापरी ॥६॥

निळ्या भोर गगनीं । पुनवी चांद चंद्रत ।
अहल्येची मूर्ति । हृदयाकाशिं तरंगत ॥ ७ ॥
अंतरंग रंगूनीयां । गावे गुण या देवीचे ।
आर्यसंस्कृतीच्या । शुद्ध इंदूर-इंदूचें ॥ ८ ॥


---

# ४—भवितव्यता.

तत्त्वप्रधान धर्म आपुला पुण्याची खाण !
तोच यशस्वी सोडुं नये तो जरि गेला प्राण. १
विश्वकुटुंबी वृत्ती सांप्रत रशियाची घ्यावी:
हिंदुपासुनि जातीमधली एकी उचलावी. २
राष्ट्रधर्मतो आङ्गलजनाच्या पासुनि उचलावा,
आपत्तींतुनि अल्प नेइ जो विजयाच्या गांवा. ३
स्वातंत्र्याचे भोग सुखाचे अमेरिका शिकवी:
तत्पुण्याई नशिबीं आपण अपुल्या आणावी. ४
पुराण अभिमानाची वृत्ती शिकविल तो चीन,
धडाडि शिकविल योग्य कारणीं तो तूर्कस्थान ५
स्वावलंबनी जर्मनिची त्या वृत्ती उचलावी,
लोकशाहिचीं तत्त्वें फ्रान्सामधुनी आणावी ६
जपानपासुनि उद्योगाचे कौशल्य तें घ्यावें,
इहपर भाग्योदय करण्याचे मार्गी धावावें. ७
त्याग करावा: क्षात्रधर्मतो केवळ स्पार्टाचा,
वैश्यधर्महि त्याज्य तसा कीं केवळ कार्थेजचा. ८
अभ्युदयाला विन्मुख केवल तें ब्रह्मज्ञान,
पूर्वीचा हा दोष दाखवी कीं आर्यस्थान ९

ब्राह्मणक्षत्रियवैश्य वागतील एका मेळानें;
प्रवृत्तीच्या निवृत्तीच्या सुवर्ण-मध्यानें १०
सतेज होईल राष्ट्रधर्म मग अपुला अभ्युदयी
संचारिल राष्ट्रामध्यें या सुभूतिविजयश्री ११
विफुल्लतेजोमती भूमि ही पूर्वी जैं होती;
वैभवभानु तळपत होता उच्चबिंदु वरती. १२
पूर्वकाळची पुनः चेतना स्फुरवा कीं आतां,
बघतां बघतां सुभाग्य येइल मग अपुल्या हातां. १३
ग्राह्याग्राह्या चिकित्सुनीयां घ्यावें त्यागावें
आर्यभूमिला श्रृंगारावें दैन्या दुरवावें १४
चैतन्याचें आजहि वारें हालवि देशाला
निराश व्हाया कारण नाहीं कांहीं अपणांला १५
तत्त्वज्ञानी चतुर धोरणी महाराष्ट्र जाणा
बंध घालितो आक्रमणाला पंजाबी नाणा १६
सत्यनिग्रही लोकसंग्रही गुजराथी वैश्य
कर्नाटक-अंध्रास शिवेना निष्ठुर दैन्य १७
पंडितागिरिचा झरा पाझरी गंगचा प्रांत
जिव्हेवरती त्या वंगाच्या सरस्वती मूर्त १८
प्रवृत्तीचें अधिष्ठान तर दिल्लीभूभागीं
नगाधिराजा वैभवशाली वेदांचा रागी १९
अंकविशारद आणिक भाविक मद्रासी देश
ईर्षा उज्ज्वल अपुली ठेवी ब्रह्मदेश खास २०
सिलोन राक्षस गुणास विन्मुख हिंद्देशदास
ब्रह्मपुत्रभू सरल मनानें प्रेमल धरि वेष २१
जागृत मंगल भूमिभाग हे रूदैव अपुल्याला
भविष्य कथितो समीप भाग्योदय धावत आला २२

# ५-हरिहर



हरि.



हर.

( चाल-गेला लाला )

पुण्याईनें ।

हरिहर हे जगतीं आले । भारती या जन्मा आले ॥ध्रु० ॥

लोकमान्य श्रीहरी तो कर्मयोगी ।

महात्माजी हर पदाला न्यस्तयोगी ।

उभयतांनीं आर्यभूमी करुनि जागी ।

स्वातंत्र्या हातीं धरुनी । दीर्घ तमाचे पट सारोनी

संस्कृतीनें जग दिपवोनी ।

सुचिर जया । मिळवुनियां । भुवनीं या ।

अवतारा प्रगटित केलें । भारताला उद्धारिलें ॥१॥

हरी चढवी अरीच्या त्या शिरीं हल्ला ।

पाहिं हर तो घालि त्याच्या पायिं घाला ।

उभयतांनीं जोर त्याचा कमी केला ।

परवशतेला सहरिती । आशा सकलां आतां देती ।
चैतन्यानें जग भारीती ।
केसरीच्या । छाव्याच्या । तेजाच्या ।
किरणांनीं जग दिपवलें । सिंहाला जागें केलें ॥ २ ॥
एक करितो आतुनीयां पाहे हल्ला ।
एक उखडीं मुळांतूनीं सर्व किल्ला ।
त्याच जागेवरी अरिचा चुरा केला ।
एकाचि स्वारी झाली । एकें अरिवृत्ति छाळिली ।
उभयांनीं अरीची केली ।
दुर्यो ती । छीःथुःती । या जगतीं ।
आपण ने विजयी झाले । भारताला भूषविलें ॥ ३ ॥
शोभतेचा जनक झाला हरी पाहीं ।
शांततेचा पिता झाला महात्माही ।
हिंद्भूचे सूत्रधारी उभयतांही ।
हरि मुत्सद्दी साधु होता । श्रीहर सत्याग्रही महात्मा ।
सुधीर गुण मेरुच्या परता ।
आत्म्याच्या । ब्रह्माच्या । योगाच्या ।
परमानदीं भारत नेलें । कीर्तिडिंडिभ झडविलें ॥ ४ ॥
शठा हारिनें शाठ्य करुनी आकळीलें ।
हरें त्याला सत्य कथुनी मुग्ध केलें ।
उभयतांनीं पाश अरिचे मुक्त केलें ।
हरि पाळी इतिहासाला । हर करितो नवक्रांतीला ।
निःशस्त्र अशा भातरभूला ।
भीमपणीं । धर्मपणीं । नवगुणीं ।
भाराते या अघटित केलें । अशक्याला विजयी केलें ॥५॥
हरी खादी वाहि अखिला भारताला ।
ओढी हर तो पुढें त्याला ने यशाला ।
कर्ममार्गी निवृत्तीला जोर आला ।

एकें सुदर्शनाला धरिलें । एकें पाशुपताला वारिलें ।
गर्भगळित अरीला केलें ।
दुंदुभिनीं । डमरूंनीं । उभयानीं ।
रणक्षेत्राला । दुमदुमविलें । निःशस्त्राला लढविलें ॥ ६ ॥
एक काढी असहकारा प्रतीयोगी ।
एक ठेवी तीच जनता असहयोगी ।
योगी हर तो हरी होता राजयोगी ।
हरि भीति दावी अरिला । हर सर्वांगीं प्रेमळ सजला ।
अरिकाळ म्हणे उभयाला ।
सिंह हरी । हर भारी । शांति धरी ।
परि उभयही दुर्धर झाले । बंदिखानीं त्यांना नेलें ॥ ७ ॥
श्रेष्ठ हरि तो श्रेष्ठ हर तो साम्यता ही ।
ईश्वराचीं दोन रूपें तीं पहाही ।
योग्य कालीं योग्यशक्ति मुक्त होई ।
हरि गेला निजधामाला । हर कारागृहीं तो बसला ।
परि उभयांच्या शक्तीला ।
भंग नसे । वादपिसें । परि कैसें ।
तुम्हां लागीं भ्रमविलें । दिव्य पदीं दोघे ठेलें ॥ ८ ॥

---

# ६–भारतकेतुवन्दनम्।

द्रष्टा यस्याऽभिदेवश्च समर्थः शिवभूपतिः ।
भक्त-मेरुमणिर्वाजिर्विजयान्यो समाचिनोत् ॥ १ ॥
महाराष्ट्रस्य धर्मस्य केतुर्यन्द्भगवा पुरा ।
जरीपटोऽयमाख्यातो मूर्तस्फूर्तिःसुकीर्तिमान् ॥ २ ॥
उथानस्याऽऽदिहेतुर्यो भक्तानां हृन्महोदधेः ।

महाकालोऽरिणा सोऽय धर्मस्वातंत्र्यहारिणाम् ॥ ३ ॥
अस्य वीर्यप्रभावेण विनष्टं किञ्चिषं भुवि ।
प्राप्तं तत्तज्जनेभ्योऽत्र मनोवाञ्छितवैभवम् ॥ ४ ॥
महाराष्ट्रस्य साम्राज्यं लब्ध यस्य प्रसादतः ।
फलं लोका आभुवँस्ते चातुर्वर्ण्यविशारदाः ॥ ५ ॥
कालेन तस्य नष्टस्य पुनरुज्जीवनं कृतम् ।
भगवल्लोकमान्येन तपस्तप्त्वा यदर्थिना ॥ ६ ॥
तस्य प्राणप्रतिष्ठा च स्थितेः कालस्य भेदनात् ।
कर्मक्षेत्रे महाराष्ट्रे कृता पुण्येन भारते ॥ ७ ॥
कर्मयोगेषु कृष्णेन यद्दृष्टं परमेष्ठिना ।
तस्मिन्दयासु महत्तत्त्वं लोककल्याणकारकम् ॥ ८ ॥
सच्च मोहनदासेन सहिष्णुमुनिनाऽधुना ।
उच्चैरुच्चैर्धृत स्कन्धे सत्याग्रहिमहात्मना ॥ ९ ॥
पावित्र्यशौर्यगांभीर्यदैवीसम्पत्प्रभाविना ।
श्वेतरक्तहरिद्वर्णो महावस्त्रे विधारितः ॥ १० ॥
दण्डे तस्य समीक्ष्येते पितापुत्रौ च नेहरू ।
नानागुणप्रकृष्टोऽयं सर्वधर्मानुयायिभिः ॥ ११ ॥
वेष्टितश्च जनैःसर्वैः चातुर्वर्ण्यस्वतेजसा ।
अस्ति तस्य विरामोऽत्र स्वातन्त्र्येण विना कुतः ॥ १२ ॥
तस्मै चैतन्यगर्भाय धर्मस्वातन्त्र्यकेतवे ।
दात्रे श्रीजयभूतिनाम् पावनाय नमोनमः ॥ १३ ॥
श्रेयसे विजिगीषूणां देशसम्पत्तिरक्षिणे ।
प्रेयसे सर्वभूतानां भूयो भूयो नमाम्यहम् ॥ १४ ॥

ग्रंथ संग्रहालय
दा. क.
शाखा

# तज्ज्ञांचे अभिप्राय

### प्रो० वि. ब. नाईक, एम्. ए. फर्ग्युसन कॉलेज

'सद्गुणसुधा' हें पुस्तक वाचून पाहिलें. त्यांत विशिष्ट गुणांनीं प्रसिद्धीस आलेल्या किंवा त्याकरितां आयुष्य वेंचणाऱ्या थोर पुरुषांची व राष्ट्रांची माहिती रसाळ भाषेंत सचित्र दिली आहे. कविता सर्वांस आवडतील अशा असून गुणोत्कर्षाकडे प्रवृत्त करणाऱ्या आहेत. पुस्तक अत्यंत संग्राह्य आहे. भारतस्नेहसंवर्धकमंडळाची ही काव्य प्रकाशनाची वृत्ति राष्ट्रपोषक आहे.

---

### प्रो० दत्तो वामन पोतदार, बी. ए. सरपरशरामभाऊ कॉलेज.

भारत–स्नेहसंवर्धक मंडळाचा प्रधान हेतु सर्व थोर विभूतींच्याविषयीं आबालवृद्धांच्याठायीं भक्ति जागृत करावी, असा असल्यामुळे तो सिद्धीस जाण्यास 'सद्गुणसुधा' च्या, प्रकाशनाचा प्रयत्न कारण होईल, अशी खात्री वाटते.

'सद्गुणसुधे'चे सहा कलश लेखकानें आबालवृद्धांस सादर केले आहेत. स्वतः कवींस थोरवीचें जसे रूप दिसलें तसें त्यांनीं चित्रित केलें आहे. थोरांमोठ्यांचें गुणस्मरण हें नुसतें पुण्यप्रद नसून उन्नतिप्रदही आहे. हाच लाभ विशेष म्हटला पाहिजे. कवितेपेक्षां गुणवंतांचीं सगुण स्वरूपें चित्ररूपानेंही पाहण्याची जी सोय केली आहे, ती कल्पना श्रेष्ठ चित्ताकर्षक व वाटते.

---

### श्री० बा. ग. जगताप, बी. ए. बी. टी. हेडमास्तर, शिवाजी मराठा हायस्कूल, पुणें.

भारत-स्नेहसंवर्धक मंडळाच्या 'सद्गुणसुधा'-प्रकाशनकार्याबद्दल मला अत्यंत आनंद वाटत आहे.

राष्ट्रकार्यामध्यें धडाडीनें भाग घेणाऱ्या देशसेवकांची ओळख, थोरांप्रमाणें लहान मुलांना देखील करून देणें अत्यंत आवश्यक आहे. ही ओळख लहान मुलांना त्यांच्या भाषेंतच करून देणें इष्ट आहे. असें द्विविध कार्य सुरेख साधलें आहे.

गाणीं व चित्रें हीं लहान मुलांची भाषा होय. या दृष्टीनें 'सद्गुणसुधा' हें पुस्तक व विशेषतः 'थोरांची थोरवी' हें प्रकरण थोरांपेक्षांही मुलांना फार आवडेल व तें त्यांना उपयुक्त होईल, असा भरंवसा वाटतो.

## देशमुखांची समाजसेवकपुस्तकमाला.

पुष्प १ लें, वाक्य रचनेची दिशा, मंजूर.... .... ८३

पुष्प २ रें, चित्रवाचनपाठमाला भा. १ ला मंजूर.. ८२

पुष्प ३, व ४ थें ,, भा. २।३ रा छापत आहेत.

पुष्प ६, ७, व ८ वें म्हणजे कित्ता नं. १, २, ३ प्र. ८८६

पुष्प ५, व ९ वें म्हणजे कित्ता नं. ४, ५ प्र.... ८८६

केशव बाजी देशमुख.

(चित्रशाळेसमोर) घ न २९९ सदाशिव पेठ पुणें


---


## घ. बा. चिपळूणकर

**यांनीं प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.**

(१) नवीन सुबोध व्याकरण (इ. ३ व ४ क.) ०-४-०

(२) ,, ,, ,, (इ. ५ ,, ) ०-४-०

(३) ,, ,, ,, (इ. ६-७ ,,) छापत आहे.

(४) घरगुती सोपा जमाखर्च (इ. ४ ,, ) ०-२-०

(५) ,, व व्यापारी ,, (इ. ५-६-७ ,, ) ०-५-०

(६) निबंध कसे लिहावें .. . ०-६-०

(७) महाराणी लक्ष्मीबाई झांशी .. ०-८-०

(८) मुलाचीं फुलें (अभिनयगीतें; मु. मो. कु.) ०-४-०

पुस्तकें सर्व प्रसिद्ध बुकसेलरकडे मिळतील.

पुणें सेवासदन सोसायटींतील गरीब विद्यार्थिनींनीं
तयार केलेले जिन्नस
सेवासदनच्या

# स्टोअरमध्यें विकत मिळतात.

जिन्नसः–(अ) खाद्य– बिस्किटें, पापड, पापड्या, लोणचीं, मसाला, मेतकूट.

(ब) कापडांपैकीं– मुलींचे व स्त्रियांचे तयार कपडे; लोंकर व लोंकरीचे गळपट्टे, मोजे, टॉवेल, हातरुमाल व कापडांचीं लहान मुलांचीं खेळणीं आणि देशी सुताचीं हातमागावरील लुगडीं.

(क) कागदकाम– फुलें, हार वगैरे.

(ड) खडी काढणें, रंग देणें, कलाबतूचें काम वगैरे.

हे जिन्नस विकत घेऊन जनतेनें स्वार्थ आणि परमार्थ साधावा.

पत्ताः– सेवासदन सोसायटी,
पुणें नंबर २.

शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलेलें

# दन्त-धावन




वापरून
आपल्या दांताचें
आरोग्य कायम
राखा.

नमुना मागवा.




"स्वच्छ व मजबूत दांत ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे."

पत्ता—दन्तधावन डेपो, पुणें २.

सर्व प्रकारचीं लहानमोठीं चित्रें, फोटो व पेंटिंगचीं कामें, उत्तम व सवलतीचे दरानें करून देऊं.



ध्यानात ठेवा कीं, सातारा वेस्टर्न इंडिया कंपनींत विमा उतरणें हें केव्हांही तुमच्या फायद्याचें ठरतें.

भ स. भडकमकर,
नागनाथपाराजवळ
पुणें नंबर २.

टपाल हाशि-
लासह वार्षिक
वर्गणी
रु २-६-०

# शालापत्रक

पानें ४०
चित्रें विपुल

## ( मुलांकरितां )

या मासिकाइतकें सर्वांग सुंदर मासिक महाराष्ट्रांत दुसरें नाहीं. यांत विविधविषयांवर नवीन गोष्टी, नवीन गाणीं व कोडीं बहारीचीं असतात. चित्रें प्रत्येक अंकांत सुमारें ४० असून येथून पुढें प्रत्येक अंकांत रंगीत चित्रें ही देण्याचा विचार आहे. इतकेंही करून वर्गणीही फारच थोडी आहे.

**मासिक शाळाखात्यानें मंजूर केलें आहे.**

हें मासिक चित्रमयजगत् व स्फूर्ति या मासिकांबरोबर घेणारांस सवलत आहे. पत्रव्यवहार करा.

**नमुना अंक फुकट पाठवूं.**

म्यानेजर-चित्रशाळा प्रेस, पुणें

# धोंडो सखाराम कुलकर्णी.

**अॅडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर म्यु स्कूल बोर्ड अमळनेर**

## यांचीं शालोपयोगी पुस्तकें.

(१) थोरांचा परिचय.... .... .... .. ०-६-०

यांत हिंदुस्थानांतील ३५ प्रसिद्ध पुरुषांचीं सचित्र चरित्रें दिलीं आहेत.

(२) जगाचा परिचय (पुस्तक पहिलें) .... ... ०-६-०

(३) ,, ,, (पुस्तक दुसरें) ....०-४-०

(४) हिंदुस्थानचा परिचय .... ... ....०-८-०

वरील दोन्ही पुस्तकांत आधुनिक पद्धतीनें आशियांतील पावसांच्या प्रदेशाची माहिती मनोरंजक भाषेंत लिहिलेली आहे. प्रवासवर्णन हेंच भूगोल शिकविण्याचें अत्युत्तम साधन होय; पण आपल्याकडे प्रवास वर्णनाचीं पुस्तकें फार थोडीं आहेत. या दृष्टीनें अशा पुस्तकांची उपयुक्तता फार आहे. पुस्तकें सचित्र असल्यानें फारच चित्ताकर्षक झालीं आहेत. शेवटल्या पुस्तकांत हिंदुस्थानचें मानव-जातीय भौगोलिक वर्णन व वैभव यासंबंधीं माहिती सचित्र आहे. भूगोल वाचीत नसून आपण कादंबरी वाचीत आहोंत असें वाटतें.

**म्यानेजर—चित्रशाळा प्रेस, पुणें.**

# साहित्यसम्राट्.



REFBK-0006041

श्री. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एल्. एल्. बी.

माजी संपादक, 'केसरी' पुणें.

## यांचा अभिप्राय

भारतस्नेहसंवर्धक मंडळानें आपल्या नांवास अनुसरून स्वदेश-सेवा विषयक कार्यांत या 'सद्गुणसुधा'-प्रकाशनाचा समावेश केला, याबद्दल त्याचें कौतुक करणें जरूर आहे. यांत थोर व्यक्तींच्या व उत्कर्ष पावलेल्या राष्ट्रांच्या सद्गुणांचें महत्त्व काव्यमय, सुबोध व सुटसुटीत पद्यांत वर्णिलें असल्यामुळें व चित्रांमुळें पुस्तक आबाल-वृद्धास आवडेल.

# मुरलीधर मोरेश्वर कुलकर्णी

## यांचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | लहान मुलांचें नवें वाचन ( मंजूर—मध्यप्रांत व मुंबई ) | किं. रु. ०—२—० |
| २ | बालगायन ( चित्रशाळा पुणें ) | ०—१२—० |
| ३ | मुलांचीं फुलें ( अभिनय—गीतें ) | ०—४—० |
| ४ | सद्गुणसुधा ( कविता ) | ०—४—० |
| ५ | उंदरानें मांजरास मारिलें ( छापत आहे ) | ०—४—० |
| ६ | धूमलीला—एक विनोदी पौराणिक खंड—काव्य ( लवकरच प्रसिद्ध होईल ) | सुमारें १—०—० |
| ७ | घोड्याचें आत्मवृत्त ( ,, ) | ,, १—०—० |
| ८ | मुलींच्या व्ह. फा. परीक्षेची प्रश्नोत्तरमाला ( चालू सालपर्यंत ) | ०—८—६ |
| ९ | हिंदुस्थानचा प्रश्नोत्तर सुलभ इतिहास | ०—६—० |

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

( १ ) पुण्यामुंबईचे प्रसिद्ध बुकसेलर्स.

( २ ) मु. मो. कुलकर्णी, शुक्रवार ३५५ पुणें.